

महाराष्ट्र शासन

अर्थसंकल्प २०१०-११

# सर्वसाधारण चर्चा


**समर्थन**

डी-२, ग्रीष्मा गार्डनच्या पाठीमागे, मधुवन हाईट्सजवळ, एव्हरशाईन गेट,
गोखिवरे, वसई (पू), ठाणे -४०१ २०८ ✆ ०२५०-३०५९११८/३०५९११९
✉: samarthanmumbai97@gmail.com

# महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प २०१०-११
# दूरदर्शीत्त्वाचा अभाव असलेला अर्थसंकल्प

महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाबद्दल गेल्या अर्थसंकल्पापासूनच बोलले जात आहे. वर्ष २००९-१०चा अर्थसंकल्प सादर करताना तत्कालीन अर्थमंत्र्यांनी सुवर्णमहोत्सवी वर्षात पायाभूत विकासासाठी रु. ११ हजार ९१५ कोटींचा विशेष कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली होती. वर्ष २०१०-११चा अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी महामहिम राज्यपाल महोदयांनीही विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर केलेल्या अभिभाषणामध्ये सुवर्णमहोत्सवी वर्षाचा उल्लेख होता. वर्ष २०१५ पर्यंत गाठावयाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने पुढील पाच वर्षांसाठी हाती घ्यावयाच्या योजना व त्यांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शासन 'संकल्प मसुदा' तयार करीत असल्याचे महामहिम राज्यपाल महोदयांनी नमूद केले होते.

या पार्श्वभूमीवर राज्याच्या अर्थसंकल्पाकडे महाराष्ट्रातील जनता मोठ्या अपेक्षेने पाहत होती. राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात शासन गेल्या ५० वर्षातील राज्याच्या वाटचालीचा आढावा घेऊन त्यानुसार अर्थसंकल्पाची मांडणी करील व योजना जाहीर करील अशी अपेक्षा होती. गेल्या २ वर्षांमध्ये मंदी, ६वा वेतन आयोग, निवडणुकांचे अर्थकारण यामुळे ढासळलेली राज्याची अर्थव्यवस्था रुळावर आणण्याच्या दृष्टीने अर्थमंत्री अर्थसंकल्पाची मांडणी करतील अशीही अपेक्षा होती. मात्र अर्थमंत्री मान. श्री. सुनिल तटकरे यांनी सादर केलेला अर्थसंकल्प या सर्व अपेक्षांवर फोल ठरला आहे.

आपल्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीस अर्थमंत्र्यांनी राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात राज्याची कोणती ध्येय-धोरणे असणार आहेत याचा उल्लेख केला होता. यामध्ये आर्थिक व सामाजिक विकासाच्या निकषांवर देशात सर्वोच्च स्थान कायम राखणे, विदेशी गुंतवणुकीसाठी प्रथम पसंतीचे राज्य बनणे, राज्याच्या सकल उत्पन्नाचा आलेख उंचावणे, रोजगार-स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, मानव विकास निर्देशांक सुधारणे अशा ध्येय-धोरणांचा समावेश होता. भाषणाच्या सुरुवातीला नमूद केलेल्या या ध्येय-धोरणांचे कोणतेही प्रतिबिंब अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात दिसले नाही.

### असे होते अर्थमंत्र्याचे भाषण...

अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री भाषणाच्या पहिल्या भागात राज्याच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन शासनाच्या महत्त्वपूर्ण योजना, विकास कामे, नवीन उपक्रम यासंदर्भात व त्यासाठी केलेल्या तरतुदींसंदर्भात माहिती सभागृहास देतात. तर भाषणाच्या दुसऱ्या भागात प्रस्तावित केलेल्या कर रचनेतील महत्त्वाच्या बदलांची माहिती शासन सभागृहास देत असते. यावर्षीचे अर्थमंत्र्यांचे भाषण ही केवळ औपचारिकता ठरली. अर्थसंकल्प मंजुरीच्या प्रक्रियेतील आपले भाषण अर्थमंत्र्यांनी बिलकूल गांभिर्याने घेतले नाही. भाषणाच्या पहिल्या भागात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांशी संबंधित २०हून अधिक मुद्दे, तीर्थक्षेत्रांचा विकास, स्मारके, पर्यटन यांचेशी संबंधित २२ मुद्दे, नाट्य, कला, क्रिडाविषयाशी संबंधित १०हून अधिक मुद्दे, केंद्र शासन सहाय्यित १०हून अधिक योजनांचा उल्लेख आहे. आपल्या भाषणामध्ये अर्थमंत्री राज्याची आर्थिक स्थिती, राज्याचा सर्वांगिण विकास, राज्यातील वंचित घटकांचा विकास, पायाभूत सुविधांचा विकास याबद्दल राज्य शासन काय करणार आहे, याबद्दल अभावानेच बोलले. भाषणाच्या दुसऱ्या भागातही अर्थमंत्र्यांनी हेअरपीन, फरसाण व कापूर-धूप यासारख्या वस्तूंवरील करांसंदर्भात बोलणेच पसंत केले.

आलेख क्र: १




| | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ३९०८७ | ४९४६९ | ५७४७८ | ६२४६२ | ६७७१४ | ६२७८४ | ७२९७४ | ८५६३७ | ९९५६३ | १२२९६३ | १२९५०० |
| सुधारित अंदाज | ५२४२७ | ५५८६२ | ६२५७१ | ७२६०५ | ७८७४७ | ७४९०७ | ८०९२२ | ८४२३३ | १०३४६१ | १२४६३३ | |
| प्रत्यक्ष खर्च | ४८५१० | ५५१६१ | ६१६६५ | ७१२०६ | ७६५०६ | ७४२१२ | ७७७०६ | ८२५४४ | १००६२२ | | |

स्रोत : वित्तविषयक विवरणपत्र, टीप : २००९-१० सुधारित अंदाज, २०१०-११ अर्थसंकल्पीय अंदाज.

– राज्याच्या अर्थसंकल्पाचे वाढत जाणारे आकारमान वरील आलेखावरून स्पष्ट होत आहे.
– वर्ष २००८-०९मध्येच अर्थसंकल्पाने १ लाख कोटींची मर्यादा ओलांडली होती.
– वर्ष २००९-१०चे खर्चाचे सुधारित अंदाज अर्थसंकल्पाचे आकारमान अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अधिक असेल असे दर्शवितात.
– त्यापूर्वीच्या ९ वर्षांचे कल पाहता (वर्ष २००७-०८चा अपवाद वगळता) खर्चाचे सुधारित अंदाज नेहमीच अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अधिक असल्याचे आढळते.
– प्रत्यक्ष खर्च मात्र नेहमीच सुधारित अंदाजापेक्षा कमी झालेला आढळतो. वर्ष २००९-१०मध्येही तोच कल कायम राहणार आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीतील पुढील माहिती या तर्कास पुष्टी देते.

*वर्ष २००९-१० मध्ये रु. ८९ हजार ६१ कोटी महसुली जमा अपेक्षित असताना एप्रिल ते डिसेंबर, २००९ या ९ महिन्यात प्रत्यक्ष महसुली जमा मात्र केवळ रु. ५६ हजार ८१० कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६३.८ टक्के) होती. तर रु. ९६ हजार १८४ कोटी महसुली खर्च अपेक्षित असताना एप्रिल ते डिसेंबर, २००९ या ९ महिन्यातील प्रत्यक्ष महसुली खर्च मात्र रु. ५५ हजार १७५ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५७.४ टक्के) एवढाच होता.*

## शासनास राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्याचा विसर
## राज्याने राजकोषीय स्थैर्य गमावले

आलेख क्र: २




| | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राजकोषीय तुटीची टक्केवारी | ३.४ | ३.९ | ५.० | ५.३ | ४.८ | ४.० | २.३ | -०.५ | २.० | ३.९ | २.७ |
| महसुली तुटीची टक्केवारी | ३.१ | ३.० | ३.१ | २.४ | २.६ | ०.९ | -०.२ | -२.५ | -०.८ | १.६ | ०.९ |

महसुली व राजकोषीय तुटीचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण हे शासनाच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार शासनास महसुली तूट २००८-०९ पर्यंत शून्यावर व राजकोषीय तूट राज्य स्थूल उत्पन्नाच्या प्रमाणात ३ टक्क्यांवर आणावयाची होती. वर्ष २००६-०७ पासून अनेक खटपटी करून शासनाने हे उद्दिष्ट साध्य केले होते. (रोजगार हमी निधी एकत्रित निधीमध्ये वळविण्याचे तेच कारण होते). २००८-०९ पर्यंत असे राजकोषीय स्थैर्य टिकविण्यात शासन यशस्वी ठरले.

- वर्ष २००९-१०चा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सादर केलेला अर्थसंकल्प रु. ७ हजार १२३ कोटी एवढ्या तुटीचा होता. ही तूट वाढून रु. १२ हजार ७३० कोटी असेल असा अंदाज आहे.
- वर्ष २०१०-११च्या अर्थसंकल्पातही रु. ७ हजार ६५४ कोटींची तूट आहे. राज्याच्या सर्व दायित्त्वांचा विचार करता राजकोषीय तूट रु. २४ हजार २९३ कोटी एवढी असणार आहे.

| वर्ष | **राजकोषीय तूट** (रु. कोटीत) | **महसुली तूट** (रु. कोटीत) | **स्थूल राज्य उत्पन्न** (रु. कोटीत) |
|---|---|---|---|
| २०००-०१ | ८५७६(३.४) | ७८३४(३.१) | २५२२८३ |
| २००१-०२ | १०५९२(३.९) | ८१८९(३.०) | २७३१८८ |
| २००२-०३ | १४८८१(५.०) | ९३७१(३.१) | २९९४७९ |
| २००३-०४ | १७९२९(५.३) | ८३०९(२.४) | ३४०६०० |
| २००४-०५ | १८६२०(४.८) | १००३४(२.६) | ३८६२९७ |
| २००५-०६ | १७६३०(४.०) | ३८४२(०.९) | ४३८७३१ |
| २००६-०७ | ११५५३(२.३) | -८१०(-०.२) | ५०८८३६ |
| २००७-०८ | -२८१७(-०.५) | -१४८०३(-२.५) | ५९०९९५ |
| २००८-०९ | १३९६०(२.०) | -५५७७(-०.८) | ६९७६८३ |
| २००९-१० | ३०९०४(३.९) | १२७३१(१.६) | ७८५९४५ |
| २०१०-११ | २४२९४(२.७) | ७६५४(०.९) | ८८५३७४ |

*कंसातील आकडे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण दर्शवितात. तक्ता व आलेख यांचा स्त्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प, टीप : २००९-१० सुधारित अंदाज, २०१०-११ अर्थसंकल्पीय अंदाज.*

## विकासात्मक खर्चाची उतरंड

आलेख क्र: ३




| | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण खर्चात विकासात्मक खर्चाचे प्रमाण | ५४.८९ | ४२.९० | ४५.६० | ४६.८५ | ५१.७१ | ६२.०८ | ६२.०२ | ६५.२७ | ६९.४८ | ६९.४८ | ६४.६० |
| एकूण खर्चात विकासेतर खर्चाचे प्रमाण | ४५.११ | ५७.१० | ५४.४० | ५३.१५ | ४७.६१ | ३७.९२ | ३७.९८ | ३४.७३ | ३०.५२ | ३०.५२ | ३४.४० |

१९९९-०० मध्ये राज्याच्या एकूण खर्चापैकी विकास खर्चाचे प्रमाण ६५.०५ टक्के होते. आघाडी शासनाच्या सुरुवातीच्या काळात या प्रमाणात घट झाली. २००२-०३ पासून हे प्रमाण सातत्याने वाढवत ठेवण्यात शासनाने यश मिळविले होते. मात्र २०१०-११ या वर्षी हा कल कायम राहणार नाही हे वरील आलेखावरून स्पष्ट होते. मागील तीन वर्षांच्या तुलनेत विकास खर्चाचे प्रमाण २०१०-११ मध्ये कमी राहील.

## विकासेतर खर्चाने गिळला महसूल

आलेख क्र: ४




| | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ८४.८४ | ८८.६९ | ८७.३९ | ८५.४७ | ७५.०३ | ६८.४३ | ५७.८६ | ५०.८८ | ५३.९४ | ६५.९९ | ७०.२९ |

महसूलाच्या तुलनेत वेतन, निवृत्ती वेतन, व्याज प्रदान यासारख्या विकासेतर बाबींवर होणारा खर्च हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. आघाडी शासनाने हे प्रमाण टप्प्या-टप्प्याने कमी करण्यात यश मिळविले होते. गेल्या २ वर्षात मात्र या निकषावरही आघाडी शासनाची पिछेहाट झाली आहे.

वर्ष २०१०-११ मध्ये शासनाच्या महसुली जमेपैकी जेमतेम ३० टक्के निधी विकासावर खर्च होईल.

स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, टीप : २००९-१० सुधारित अंदाज, २०१०-११ अर्थसंकल्पीय अंदाज

## भांडवली खर्चाचा उतरता कल

आलेख क्र: ५




कायमस्वरुपी मत्ता निर्माण करण्यासाठी अथवा विकत घेण्यासाठी केलेल्या खर्चाचे भांडवली खर्च म्हणून वर्गीकरण केले जाते. सर्वसाधारणपणे भांडवली खर्च हा कर्जाद्वारे उभारलेल्या निधीतून तसेच आधीच्या वर्षातील शिल्लक रोख रकमेतून भागविला जावा अशी अपेक्षा असते.

आघाडी शासनाच्या काळात सर्वाधिक भांडवली खर्च वर्ष २००३-०४ मध्ये ३९.३४ टक्के एवढा झाला. त्यानंतर या प्रमाणात सातत्याने घट होत गेली. वर्ष २००८-०९मध्ये भांडवली खर्चाच्या प्रमाणात किंचित वाढ झाली. २००९-१० व २०१०-११चे अनुक्रमे सुधारित व अर्थसंकल्पीय अंदाज मात्र पुन्हा घटीचाच कल कायम ठेवत आहेत.

## भांडवली खर्चातील वाढत गेलेले विकास खर्चाचे प्रमाणही घटणार

आलेख क्र: ६




कर्ज व शिलकेतून केल्या जाणाऱ्या खर्चाचे प्रमाण विकासात्मक असणेच अपेक्षित आहे. १९९९-०० या वर्षी भांडवली खर्चातील विकास खर्चाचे प्रमाण ८५ टक्के एवढे अधिक होते. वर्ष २००१-०२ मध्ये या प्रमाणाने निचांक गाठला. त्यानंतरच्या वर्षांमध्ये सातत्याने हे प्रमाण वाढवत नेण्यात आघाडी शासनाने यश मिळविले होते. वर्ष २००९-१० व २०१०-११चे अंदाज मात्र आधीच्या वर्षाच्या तुलनेत भांडवली विकास खर्चाच्या प्रमाणात घट दर्शवित आहेत.

स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, टीप : २००९-१० सुधारित अंदाज, २०१०-११ अर्थसंकल्पीय अंदाज

## महसुली खर्चातील विकास खर्चातही घट

आलेख क्र: ७




आघाडी शासनाने आपला पहिला अर्थसंकल्प मांडला त्यावर्षी म्हणजे २०००-०१मध्ये महसुली खर्चामधील विकास खर्चाचे प्रमाण ६०.६९ टक्के होते. २००१-०२ पासून त्यात घसरण झाल्यानंतर पुन्हा २००४-०५ पासून त्यात सातत्याने वाढ होताना दिसत होती. २००८-०९ पर्यंत हे प्रमाण ६४.८८ टक्के एवढे वाढले. २००९-१० या वर्षासाठीचे सुधारित अंदाजही महसुली खर्चातील विकास खर्चाचे प्रमाण ६७.९६ टक्के एवढे वाढेल असे दर्शवित असले, तरी वर्ष २०१०-११मध्ये महसुली विकास खर्चाच्या प्रमाणात ६२.६७ टक्के घट होईल असे अंदाजित करण्यात आले आहे.

## एकूण खर्चामध्ये महसुली - भांडवली व विकास - विकासेतर खर्च

रुपये कोटीत

| | महसूली खर्च | | भांडवली खर्च | | एकूण खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | विकास | विकासेतर | विकास खर्च | विकासेतर | विकास खर्च | विकासेतर खर्च |
| २०००-०१ | २२६९८.८२ | १४७०२.१४ | ३७३६.९७ | ७०२१.९४ | २६४३५.७९ | २१७२४.०८ |
| २००१-०२ | २०५५०.९८ | १७७३०.५४ | ३००७.२७ | १३६२२.५५ | २३५५८.२५ | ३१३५३.०९ |
| २००२-०३ | २२५२७.५० | १७९४६.८ | ५३८७.७६ | १५३५२.८४ | २७९१५.२६ | ३३२९९.६४ |
| २००३-०४ | २२८५९.९८ | १९८२०.०८ | १०१०१.१३ | १७५७४.५४ | ३२९६१.११ | ३७३९४.६२ |
| २००४-०५ | २८७७५.५१ | २२२७१.१५ | १०६२७.६४ | १४५३१.८६ | ३९४०३.१५ | ३६८०३.०१ |
| २००५-०६ | ३०५८३.३४ | २१६९६.५१ | १४३४०.०६ | ५७४१.६५ | ४४९२३.४० | २७४३८.१६ |
| २००६-०७ | ३६२७८.९८ | २५१०६.३० | १२४१३.८० | ४७०६.४५ | ४८६९२.७८ | २९८१३.०५ |
| २००७-०८ | ४०९३३.६३ | २३८४६.४२ | १२७१४.७६ | ४६९९.११ | ५३६४८.३९ | २८५४५.५३ |
| २००८-०९ | ४९११०९.२१ | २६५८४.७१ | २०८०३.८० | ४२१४.५१ | ६९९१३.०१ | ३०७०९.२२ |
| २००९-१० | ६८०८५.४० | ३३१४३.१४ | १८५१२.१९ | ४८९२.४८ | ८६५९७.५९ | ३८०३५.६३ |
| २०१०-११ | ६६६५७.७५ | ३८०४०.६६ | १६९९३.५७ | ७८०७.९० | ८३६५१.३२ | ४५८४८.५६ |

आलेख व तक्ता यांचा स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, टीप : २००९-१० सुधारित अंदाज, २०१०-११ अर्थसंकल्पीय अंदाज

## कर्जाचा विळखा कायम

## राज्यावरील एकूण कर्जाची रक्कम रु.२ लाख ९ हजार ६४८ कोटी

आलेख क्र: ८




राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. युती शासनाकडून आघाडी शासनाच्या हाती सत्ता आली त्यावेळी राज्यावरील कर्जाचा बोजा रु. ४२ हजार ६६६ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या १७.२ टक्के) होता. २००४-०५मध्ये आघाडी शासन दुसऱ्यांदा निवडून आले त्यावेळी हा बोजा रु. १ लाख ९ हजार १६६ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या २८.३ टक्के) एवढा वाढला होता. आघाडी शासनाने तिसऱ्यांदा सत्ता हाती घेतली आहे. २०१०-११च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्यावरील कर्ज रु. २ लाख ९ हजार ६४८ कोटी एवढे असेल व त्यावर शासन रु. १६ हजार ४६९ कोटी व्याज भरेल. २०१०-११ यावर्षी अधीच्या दोन वर्षांच्या तुलनेत कर्जाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी प्रमाण वाढलेले असेल.

### राज्याचे एकूण कर्ज, व्याज तसेच दरडोई उत्पन्न, खर्च व कर्ज-व्याज

| वर्ष | राज्याचे एकत्रित (रुपये कोटीत) | | दरडोई (रकमा रुपयात) | | |
|---|---|---|---|---|---|
| | कर्ज | व्याज | उत्पन्न | खर्च | कर्ज व व्याज |
| २०००-०१ | | | १५,१८० | ४,९८० | ७,३०८ |
| २००१-०२ | ७२,१२२ | ७,८३४ | १५,०७० | ५,५५८ | ८,०९२ |
| २००२-०३ | ८२,५४९ | ८,७१४ | १५,४८४ | ६,०६७ | ९,०४४ |
| २००३-०४ | ९७,६७४ | ९,९०२ | १६,४७९ | ६,९४५ | १०,६१९ |
| २००४-०५ | १,०९,१६७ | १०,२५८ | १७,८६४ | ७,४२० | ११,६२८ |
| २००५-०६ | १,२४,३६५ | १०,५२३ | २९,०८५ | ५,०१९ | १२,९५७ |
| २००६-०७ | १,३३,७२२ | ११,९८३ | ४१,३३१ | ५,८०५ | १३,८९४ |
| २००७-०८ | १,४२,३८२ | १२,९३२ | ४७,०५१ | ६,०३६ | १४,८५६ |
| २००८-०९ | १,६१,२७६ | १३,०२७ | ५४,८६७ | ६,८५० | १५,८७७ |
| २००९-१० | १,८३,८२५ | १४,६४७ | - | ९,१६१ | १८,२९२ |
| २०१०-११ | २,०९,६४८ | १६,४६९ | - | ९,४७४ | २१,५७६ |

स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प व महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, टीप : २००९-१० सुधारित अंदाज, २०१०-११ अर्थसंकल्पीय अंदाज

# वर्ष २००९-१० व २०१०-११च्या अर्थसंकल्पीय अंदाजांची तुलना

## रुपया येतो कसा

| अ.क्र. | तपशील | २००९-१० | २०१०-११ | बदल |
|---|---|---|---|---|
| १. | राज्याचा स्वत:चा कर महसूल | ४१.८८ | ४९.३५ | ७.४७ |
| २. | राज्य शासनाचे देशांतर्गत कर्ज | २१.०१ | २२.५४ | १.५३ |
| ३. | केंद्र सरकारकडून सहाय्यक अनुदाने | १२.८२ | ०९.३६ | -३.४६ |
| ४. | केंद्रीय करांमधील हिस्सा | ०७.०४ | ०८.४१ | १.३७ |
| ५. | राज्याचा स्वत:चा करेतर महसूल | ११.४१ | ०७.९० | -३.५१ |
| ६. | केंद्र शासनाकडून कर्जे | ०१.०१ | ०.८५ | -०.१६ |
| ७. | लोक लेखा (निव्वळ) | ०४.५२ | १.३१ | -३.२१ |
| ८. | शासनाच्या कर्जे व अग्रीमे यांची वसुली | ०.३ | ०.२७ | ०.२४ |

## रुपया जातो कसा

| अ.क्र. | तपशील | २००९-१० | २०१०-११ | बदल |
|---|---|---|---|---|
| १. | सामाजिक सेवा | २४.६५ | ३६.७८ | १२.१३ |
| २. | आर्थिक सेवा | २४.२८ | १४.१५ | -१०.१३ |
| ३. | सर्वसाधारण सेवा | १६.२३ | १६.३६ | ०.१३ |
| ४. | भांडवली खर्च | १५.३३ | १२.५७ | -२.७६ |
| ५. | व्याजप्रदाने व ऋणसेवा | १२.३७ | १३.०२ | ०.६५ |
| ६. | सरकारी ऋणाची परतफेड | ५.५२ | ६.०३ | ०.५१ |
| ७. | स्थानिक संस्थांना सहाय्यक अनुदाने | ०.८३ | ०.५४ | -०.२९ |
| ८. | राज्य शासनाने दिलेली कर्जे व अगाऊ रकमा | ०.८१ | ०.५५ | -०.२६ |

## महसुली व भांडवली जमा-खर्चाचे प्रमाण







स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प व महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, टीप : २००९-१० सुधारित अंदाज, २०१०-११ अर्थसंकल्पीय अंदाज

## महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीतील ठळक मुद्दे

**आर्थिक :**

- स्थिर (१९९९-००) किमतीनुसार वर्ष २००८-०९चे स्थूल राज्य उत्पन्न रु. ४ लाख ४२ हजार ४२१ कोटी अपेक्षित असून दरडोई स्थूल राज्य उत्पन्न रु. ४० हजार ६१४ कोटी असेल.
- चालू किमतीनुसार वर्ष २००८-०९चे स्थूल राज्य उत्पन्न रु. ६ लाख ९२ हजार ७४९ कोटी असून दरडोई स्थूल राज्य उत्पन्न ६३ हजार ६०९ रुपये असेल.
- स्थिर (१९९९-००) किंमतीनुसार कृषि व संलग्न कार्ये क्षेत्रात १९.३ टक्के घट होईल असे २००८-०९चे प्रारंभिक अंदाज वर्तवितात. ही घट मागील ५ वर्षातील सर्वाधिक घट आहे.
- देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा हिस्सा सुमारे १३ टक्के आहे.
- स्थूल राज्य उत्पन्नात औद्योगिक व सेवा क्षेत्राचा हिस्सा ८९ टक्के आहे.
- ५५ टक्के लोकसंख्या उपजिविकेसाठी अवलंबून असलेल्या कृषी व संलग्न कार्ये या क्षेत्राचा स्थूल राज्य उत्पन्नातील हिस्सा केवळ ११ टक्के आहे.
- मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, पुणे व नागपूर या जिल्ह्यांचा राज्य उत्पन्नातील वाटा ५५ टक्के आहे.
- राज्यातील २५ जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न राज्याच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा कमी आहे.
- वाशिम (रु. २३,६२८), जालना (रु.२३,६३५) व गडचिरोली (रु.२४,३७०) या जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न सर्वात कमी असून मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक रु. ८९,३४३ आहे.

**लोकसंख्या :**

- राज्याच्या एकूण लोकसंख्येमध्ये १५ ते ५९ या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण ५९ टक्के आहे, जे संभाव्य कार्यबल मानले जाते.
- राज्यातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण ४२ टक्के असून देशपातळीवर हे प्रमाण २७.८ टक्के आहे.
- अधिक नागरिकरणामुळे राज्यातील लोकसंख्येची घनता प्रति चौ. कि. मी. ३१५ व्यक्ती एवढी आहे.
- राज्यातील शहरे व नगरांमधील प्रत्येक ३ व्यक्तींपैकी १ व्यक्ती झोपडपट्यांमध्ये रहात होती.
- सन २००७ मधील जन्मदर (१८.१) व बालमृत्यू दर (३४) कमी होऊन अनुक्रमे १७.९ व ३३ झाले आहेत.
- २००१मधील राज्यातील स्त्री-पुरुष प्रमाण ९२२ एवढे असून २०११मध्ये ते ९१५ एवढे कमी होईल.

**दारिद्र्य :**

- वर्ष २००४-०५ मध्ये राज्यात दारिद्र्याचे प्रमाण ३०.७ होते. भारतासाठी हे प्रमाण २७.५ टक्के होते.
- राज्यात दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या १९९३-९४ च्या तुलनेत २००४-०५ मध्ये १२ लाख २० हजारांनी वाढून ३ कोटी १७ लाख ४० हजार एवढी झाली.

- वर्ष १९९७ मध्ये राज्याच्या ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण ३४.६ होते ते वर्ष २००२ मध्ये ३५.८ असे वाढले. तर याच कालावधीत राज्याच्या नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण ८.८ टक्क्यांवरून १३.९ टक्के एवढे वाढले.

**रोजगार:**

- कृषि व संलग्न कार्ये या क्षेत्रातील मुख्य कामगारांचे १९९१ मधील ५५.९ टक्के एवढे प्रमाण कमी होऊन २००१ मध्ये ते ४५.१ एवढे होते.
- मुख्य कामगारांचे प्रमाण १९९१ ते २००१ या कालावधीत ९१.४ टक्क्यांवरून ८४.३ टक्के एवढे कमी झाले.
- या उलट सिमांतीक कामगारांच्या प्रमाणात १९९१ ते २००१ या कालावधीत ८.६ टक्क्यांवरून १५.७ टक्के एवढी वाढ झाली.
- रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केद्रांमध्ये डिसेंबर, २००९ अखेर नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या २८ लाख ७६ हजार होती. वर्ष २००९ मध्ये १७ हजार उमेदवारांना रोजगार पुरविण्यात आला.
- वर्ष २००९ या वर्षात संप व टाळेबंदीमुळे वाया गेलेल्या मनुष्य दिवसांची संख्या २७ लाख ५५ हजार इतकी होती.
- वर्ष २००९-१० मध्ये सप्टेंबर २००९ अखेर बंद पडलेल्या लघु उद्योगांची संख्या (४४,९९७) वर्ष २००८-०९ पेक्षा (३३,३५९) ३५ टक्के अधिक होती.
- वर्ष २००८-०९मध्ये ८०८ मध्यम व मोठे उद्योग बंद पडले होते. वर्ष २००९-१०मध्ये बंद पडलेल्या उद्योगांची संख्या ८४५ एवढी होती.
- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर, २००९ अखेर राज्यात स्थापन केलेल्या स्वसहाय्यता गटांची एकूण संख्या २,२५,१४० होती. त्यापैकी केवळ ६१,३२५ (२७.२४ टक्के) स्वसहाय्यता गट प्रत्यक्षात कार्यरत आहेत.
- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २००९-१० मध्ये (जानेवारी, २०१० अखेर ) २ कोटी ४० लाख मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली, तर २००८-०९मध्ये रोजगार हमी योजना व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मिळून ४ कोटी २ लाख मनुष्य दिवस रोजगार पुरविण्यात आला होता.
- वर्ष २००९-१० मध्ये जानेवारी, २०१० पर्यंत (९ महिन्यात) रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची संख्या ५,६८,०६० असली तरी यापैकी केवळ १७,७८७ कुटुंबांना (३.१ टक्के) १०० दिवसांपेक्षा अधिक रोजगार पुरविण्यात आला.

**आरोग्य:**

- राज्यात १९९१ या वर्षी उपलब्ध आरोग्य संस्थांचा विचार करता प्रति लाख लोकसंख्येमागे १४४ खाटा उपलब्ध होत्या. हे प्रमाण वर्ष २००८-०९पर्यंत ९१ एवढे कमी झाले आहे.
- २००८-०९ या वर्षी सार्वजनिक आरोग्य सेवांसाठी एकूण रु. १ हजार १५६ कोटी ४६ लाख नियतव्यय देण्यात आला होता. यापैकी केवळ रु. ५५५ कोटी २५ लाख (४८.०१ टक्के) एवढाच निधी खर्च झाला.

- २००९-१० या वर्षासाठी आरोग्य सेवांसाठी रु. १ हजार १९३ कोटी १९ लाख एवढा नियतव्यय देण्यात आला होता. ऑक्टोबर, २००९ पर्यंत (७ महिन्यात) यापैकी केवळ १२५ कोटी ३३ लाख (१० टक्के) निधी खर्च झाला.
- आरोग्य सेवांवर राज्य शासनाने खर्च केलेल्या निधीचे स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नाशी प्रमाण ०.३२ टक्के एवढे होते.
- वर्ष २००९-१० मध्ये नोव्हेंबर, २००९ अखेर सर्वसाधारणपणे ३८.५ टक्के बालके व ५१.७ टक्के आदिवासी बालके कुपोषित आढळली.

**प्राथमिक शिक्षण:**

- सर्व शिक्षा अभियानासाठी वर्ष २००९-१० मध्ये रु. १ हजार १९३ कोटी ८६ लाखांची तरतूद करण्यात आली होती. जानेवारी, २०१०पर्यंत त्यापैकी ६८६ कोटी ९१ लाख (५७.५ टक्के) इतका निधी खर्च झाला.
- वर्ष २००९-१० मध्ये ऑक्टोबर, २००९ पर्यंत केवळ २९ टक्के शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.
- वर्ष २००९-१०मध्ये विकलांग समावेशक शिक्षण या कार्यक्रमांतर्गत विशेष गरजा असलेल्या ४ लाख १४ हजार मुलांसाठी सुविधा पुरविण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. जानेवारी, २०१० पर्यंत केवळ १ लाख ७२ हजार मुलांपर्यंत शासन पोहचू शकले.
- राज्याचा शिक्षण विकास निर्देशांक ०.७० असून, संपुर्ण देशामध्ये राज्य १५व्या क्रमांकावर आहे.
- राज्यातील १०,७३४ (१२.३ टक्के) शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा नाहीत.
- राज्यातील १९,९८५ (२२.९ टक्के) शाळांमध्ये शौचालयाची व्यवस्था नाही.
- राज्यातील ३१,५०५ (३६.१ टक्के शाळांमध्ये) मुलींकरिता स्वतंत्र शौचालय नाही.

**सामाजिक न्याय:**

- अनुसूचित जाती उपयोजनेसाठी वर्ष २००९-१० मध्ये रु. २ हजार ६५२ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला होता. सप्टेंबर, २००९ पर्यंत म्हणजेच ६ महिन्यांमध्ये यापैकी केवळ ५.३५ टक्के निधी (रु. १४२ कोटी १३ लाख) खर्च झाला.
- आदिवासी उपयोजनेसाठीही वर्ष २००९-१० मध्ये रु. २ हजार ८५ कोटी ६१ लाख एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला होता. ऑक्टोबर, २००९ पर्यंत म्हणजेच ७ महिन्यांमध्ये यापैकी केवळ ९.४ टक्के निधी (रु. १९७ कोटी ७६ लाख) खर्च झाला.

**महागाई:**

- राज्यातील ३१ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली असून खाद्यपदार्थांच्या किंमतीमध्ये सातत्याने होणारी वाढ समाजातील दुर्बल घटकांवर प्रतिकूल परिणाम करत असते. त्यामुळे चलनवाढ ही राज्य तसेच देशासाठी एक संवेदनशील बाब आहे.

- एप्रिल, २००९मध्ये राज्यातील ग्रामीण भागाचा ग्राहक किंमती निर्देशांक १४९.३ होता. त्यात सातत्याने वाढ होत तो डिसेंबर, २००९मध्ये १७२.८ झाला. ही वाढ प्रामुख्याने खाद्यपदार्थ गटातील वस्तूंच्या किमतींमध्ये झालेल्या वाढीमुळे झाली.
- त्याचप्रमाणे राज्याच्या नागरी भागाचा ग्राहक किंमती निर्देशांक एप्रिल, २००९मध्ये १४४.१ होता. त्यात वाढ होऊन तो डिसेंबर, २००९मध्ये १६५.९ झाला.

**रस्ते:**

- १९९०-९१ च्या तुलनेत राज्यातील रस्त्यांची लांबी १३७ टक्के वाढली तर राज्यातील वाहनांची संख्या ५३६ टक्के एवढी वाढली.
- दिनांक ३१ मार्च २००९ रोजी राज्यातील ३८,४७९ वस्ती असलेल्या गावांपैकी साधारण ८४६ गावांना बारमाही रस्ते नव्हते तर २७५ गावे कोणत्याही रस्त्याने जोडलेली नव्हती.
- मार्च, २००९ अखेर राज्यातील सुमारे १,३१० गावांमधील रहिवाशांना जवळच्या बस थांब्यावर पोहोचण्यासाठी सरासरी ५ कि.मी. पेक्षा जास्त अंतर चालावे लागत होते.

**इंदिरा आवास योजना:**

- वर्ष २००९-१० या वर्षासाठी २ लाख २३ हजार ६५३ घरांचे लक्ष्य निर्धारीत केले होते. यासाठी केंद्र शासनाने ४५७ कोटी ७४ लाख रुपयांची व राज्य शासनाने ९४७ कोटी ७६ लाख रुपयांची अशी एकूण मिळून रु. १ हजार ४०५ कोटी ५० लाखांची तरतूद केली होती.
- डिसेंबर, २००९ अखेर (९ महिन्यांमध्ये) केवळ ८२ हजार १३ घरकुलांचे (३६.६६ टक्के) बांधकाम पूर्ण होऊन ३०.४९ टक्के निधी खर्च झाला आहे.

**पर्यटन:**

- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने वर्ष २००५-०६ ते वर्ष २००८-०९ मध्ये हाती घेतलेल्या ३१ प्रकल्पांपैकी केवळ १३ प्रकल्प पुर्ण झाले असून या सर्व प्रकल्पांसाठी अंदाजित करण्यात आलेल्या रु. ११२ कोटी ७३ लाखापैकी केवळ रु. ३३ कोटी ८६ लाख खर्च झाले आहेत.

**उद्योग:**

- राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ६२व्या फेरीनुसार राज्यात एका नोंदणीकृत कारखान्यामागे असंघटित क्षेत्रात कार्यरत ६० आस्थापना आहेत.
- राज्यात नोंदणीकृत औद्योगिक वसाहतींची संख्या १४२ असून यापैकी केवळ ९५ वसाहती कार्यरत आहेत.

## जीवनदायी योजना – नव्या बाटलीत जुनेच 'औषध'

अर्थसंकल्प सादर करताना मान. अर्थमंत्र्यांनी राजीव गांधी जीवनदायी योजना सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. मान. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक विश्वस्त मंडळ स्थापन करण्यात येईल व पहिल्या टप्प्यासाठी रु. २५० कोटींची तरतूद करण्यात येईल असेही अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले आहे. अर्थमंत्र्यांच्या या घोषणा म्हणजे निव्वळ धूळफेक आहे.

राज्यात वर्ष १९९७ पासून जीवनदायी योजना राबविली जात असून योजनेसाठी रु. २५० कोटींचा निकाय निधी (कॉर्पस) उभारण्याचे उद्दिष्ट योजनेच्या सुरुवातीपासूनच ठेवण्यात आले होते. गेल्या १२ वर्षांमध्ये शासनाला जेमतेम रु. १४ कोटींचा निधी योजनेसाठी उभारता आला.

वर्ष २००७-०८ या वर्षी फलनिष्पत्ती अर्थसंकल्पाच्या माध्यमातून या योजनेचा आढावा घेण्यात आला होता. या आढाव्यानुसार १० वर्षांमध्ये केवळ १०,८६८ रुग्णांना (दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येपैकी ०.१ टक्के) या योजनेचा लाभ मिळाल्याचे निदर्शनास आले होते. त्याचप्रमाणे केवळ हृदय शस्त्रक्रियांसाठीच ही योजना राबविली गेली. योजनेंतर्गत ३२ रुग्णालयांना मान्यता देण्यात आली होती व त्यापैकी २४ रुग्णालये खाजगी होती. यापैकी बहुतांश रुग्णालयांनी योजना राबविली नव्हती. योजनेचा लाभ घेतलेल्यापैकी ८० टक्के रुग्णांनी मुंबईतील ४ शासकीय / पालिका रुग्णालयांमधून व विशेषत: जे. जे. रुग्णालयातून शस्त्रक्रिया करून घेतल्या. या शिवाय योजनेंतर्गत रुग्णास रु. १ लाख ५० हजार एवढी रक्कम उपलब्ध होऊ शकत असताना केवळ रु. ५० हजार एवढीच रक्कम सर्वसाधारणपणे मंजूर करण्यात येत होती. पर्यायाने रुग्णांना स्वत:चे पैसे उभे करावे लागत होते.

शासनाच्या इच्छाशक्ती अभावी अपयशी ठरलेली ही योजना १२ वर्षांनंतर राजीव गांधींचे नाव देऊन शासनाने पुन्हा एकदा सादर केलेली आहे.

## राष्ट्रीय रोजगार हमी योजना – अर्थमंत्र्यांनी दिलेली माहिती दिशाभूल करणारी

२००९-१० या वित्तिय वर्षात जानेवारी, २०१० अखेर योजनेवर रु. ६०१ कोटी खर्च झालेला असून त्यातून ५ कोटी मनुष्य दिवसांची निर्मिती झालेली आहे हा अर्थमंत्र्यांनी केलेला दावा तद्दन खोटा आहे. दिनांक २७ मार्च २०१० रोजी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या संकेतस्थाळावर उपलब्ध माहितीनुसार २००९-१० या वर्षामध्ये २ कोटी ४३ लाख ८२ हजार मनुष्य दिन निर्मिती झालेली असून योजनेवर एकूण रु. २८७ कोटी ४२ लाख ७३ हजार एवढी रक्कम खर्च झाली आहे.

महाराष्ट्रापासून प्रेरणा घेऊन देशभरात ही योजना राबविली जात असली तरी राज्यातील योजनेची अंमलबजावणी मात्र चिंताजनक आहे. संकेतस्थळावर उपलब्ध पुढील माहितीवरून ते स्पष्ट होते.

| तपशील | २००९-१० (२७ मार्च २०१०पर्यंत) |
|---|---|
| जॉबकार्ड प्राप्त झालेल्या कुटुंबांची संख्या | ६,०३,३४७ |
| जॉबकार्ड प्राप्त न झालेल्या कुटुंबांची संख्या | ७,३३,७८९ |
| रोजगार प्राप्त झालेल्या कुटुंबांची संख्या | ६,०३,३४१ |
| १० दिवसांपर्यंत रोजगार उपलब्ध झालेल्या कुटुंबांची संख्या | ५९,५५१ |
| ११ दिवस ते १ महिन्यापर्यंत रोजगार उपलब्ध झालेल्या कुटुंबांची संख्या | १,३३,८३४ |
| १ महिन्यापेक्षा अधिक ते ३ महिन्यांपर्यंत रोजगार उपलब्ध झालेल्या कुटुंबांची संख्या | ९३,२४५ |
| १०० दिवसांपेक्षा अधिक रोजगार उपलब्ध झालेल्या कुटुंबांची संख्या | २२,०७८ |
| पोस्ट वा बँकेमार्फत मजुरी घेणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | ५४.७४ |
| पोस्ट वा बँकेमार्फत मजुरी घेणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी असणारे जिल्हे | १५ |

## राज्य भारनियमन मुक्त करण्याचे दिवास्वप्न

सन २०१२ पर्यंत राज्य भारनियमन मुक्त करण्यासाठी विद्युत निर्मिती कंपनी मार्फत प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगून अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात 'त्याच त्या' परळी, पारस, खापरखेडा, भुसावळ प्रकल्पांचा उल्लेख केला आहे. गेल्या अनेक वर्षातील तत्कालीन अर्थमंत्र्यांची भाषणे पाहिली असता त्यात या प्रकल्पांचा उल्लेख न चुकता आढळतो. या पार्श्वभूमीवर राज्य नियोजन मंडळाने नोंदविलेली निरीक्षणे लक्षात घेण्यासारखी आहेत:

''महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर काही काळ असा होता की, राज्याच्या अर्थसंकल्पात उर्जा क्षेत्राचा महसुली वाटा असायचा. तथापि, त्यानंतरच्या काळात या क्षत्राची कार्यक्षमता वाढविण्याकडे झालेले दुर्लक्ष व एकूणच या क्षेत्राच्या स्वयंपूर्णतेविषयी उदासिनता आदि कारणांमुळे परिस्थिती नेमकी उलट झाली असून आता राज्याच्या अर्थसंकल्पातही उर्जा क्षेत्रासाठी पुरेशा तरतुदी करणे अवघड होऊन बसले आहे. उर्जा क्षेत्रातून मिळणाऱ्या महसुलातून वीज निर्माण करण्याइतके उर्जा क्षेत्र स्वयंपूर्ण होणे अशक्य होऊन बसले आहे. अंतर्गत स्त्रोतातून वीज निर्मिती प्रकल्प उभे राहणे येथून पुढे अवघड आहे.''

राज्य नियोजन मंडळाच्या अहवालावरून व नियोजन आयोगाच्या राज्य विकास अहवालावरून स्पष्ट होणाऱ्या बाबी:

- सध्या चालू असलेल्या वीज निर्मिती केंद्रांची केवळ ७५ टक्केच क्षमता वापरली जात आहे.
- यासाठी जुनी यंत्र सामुग्री व संच, निकृष्ट प्रतीचा कोळसा, नियोजनाचा अभाव कारणीभूत आहे.
- गेल्या दहा वर्षात विजेची मागणी ४० टक्क्यांनी वाढली असताना वीज निर्मिती मात्र २.५ टक्केच वाढली आहे.
- वीज निर्मितीमध्ये १९९१ ते २००१ या कालावधीत ७.६८ टक्के तर २००१ ते २००८ या कालावधीत केवळ ०.४० टक्केच वाढ झाली.
- पारेषण व वितरणादरम्यान होणारी वीजेची हानी राज्यात ३९.४ टक्के असून आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे हे प्रमाण १० टक्के एवढे कमी आहे. भारत सरकारच्या केंद्रिय वीज प्राधिकरणाने १६ टक्के हानीचा निकष ठरविलेला आहे.

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००९-१० मध्ये नोंदविण्यात आलेली निरीक्षणे:

- देशातील एकूण वीज निर्मितीपैकी ११ टक्के वीज निर्मिती राज्यात होते. तर देशातील एकूण वीज वापरापैकी १४ टक्के वीज वापर राज्यात होतो.
- डिसेंबर २००९ अखेर राज्यात ३७ हजार ६९४ दशलक्ष किलोवॅट विजेची निर्मिती झाली. राज्यातील विजेची तूट सुमारे ४ हजार ९४१ मे. वॅट आहे.
- महापारेषण कंपनीची विजेची पारेषण हानी २००८-०९ मध्ये ४.९ टक्के होती.
- महावितरण कंपनीची वीज वितरण हानी २२ टक्के होती.
- वर्ष २००९-१० मध्ये ३१ डिसेंबर २००९ पर्यंत विजेची मागणी १५ हजार ९८८ मेगावॅट एवढी होती. केवळ ११ हजार ८८३ मेगावॅट विजेचा पुरवठा झाल्याने ४ हजार १०६ मेगावॅटचे भारनियमन करण्यात आले.

- राज्यात वस्ती असलेली ४१,०९५ गावे असून त्यापैकी ३६,०१० गावांचे विद्युतिकरण झालेले असून अद्याप ५,०८५ गावांचे विद्युतिकरण व्हायचे आहे.
- दिनांक ३१ मार्च २००९ रोजी कृषिपंपांच्या वीज जोडणीसाठी प्रलंबित अर्जांची संख्या २ लाख ८८ हजार एवढी होती.
- पवन, सौर, जैविक, बायोगॅस, समुद्र लाटा व भू-औष्णिक हे अक्षय उर्जेचे स्त्रोत आहेत. राज्यात ७,८५२ मेगावॅट इतकी अक्षय उर्जा क्षमता असून त्यापैकी ६७ टक्के क्षमता अद्याप स्थापित झालेली नाही. त्याकरिता रु. २६ हजार ५२७ कोटी गुंतवणुकीची आवश्यकता आहे.

**सिंचनात वाहून गेलेला निधी**

सन २००९-१० या वर्षाकरिता रु. ७,५७८ कोटी पाटबंधारे प्रकल्पांसाठी उपलब्ध करून देण्यात आले असून त्यातून १ लाख ७५ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट ठरविण्यात आल्याचे अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात नमूद केले आहे. याशिवाय २०१०-११मध्ये शासन सिंचनासाठी उपलब्ध करून देणाऱ्या निधीची माहितीही त्यांनी आपल्या भाषणात दिलेली आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्प सादर करताना वित्तमंत्र्यांनी सिंचनासाठीचा अनुशेष दूर केल्याची घोषणा केलेली होती.

देशातील कोणत्याही राज्याने सिंचनावर केलेल्या गुंतवणुकीपेक्षा महाराष्ट्राने सिंचनावर केलेली गुंतवणूक सर्वाधिक असली तरी रखडलेले प्रकल्प, कालव्यांच्या बांधकामांकडे झालेले दुर्लक्ष यामुळे सिंचनाचा लाभ होण्यामध्ये महाराष्ट्र सर्वात पिछाडीवरील राज्य आहे. राज्याची सिंचन क्षमता १२६ लाख हेक्टर वाढू शकेल असे अनुमान जल व सिंचन आयोगाने काढलेले असताना राज्य मात्र जेमतेम ६० लाख हेक्टर क्षमता साध्य करू शकले आहे. शिवाय निर्माण केलेल्या क्षमतेपैकीही साधारणपणे ५५ टक्के क्षमतेचाच प्रत्यक्ष वापर होतो.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये सिंचनावर एकूण खर्चापैकी १४ टक्के खर्च झालेला होता. नवव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत हे प्रमाण ३३ टक्के एवढे वाढले. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्येही सिंचनावर एकूण खर्चापैकी २७ टक्क्यांहून अधिक खर्च करण्यात आला. वर्ष २००९-१०च्या वार्षिक योजनेमध्येही सिंचनासाठी २१ टक्के नियतव्यय राखून ठेवलेला होता.

महामहिम राज्यपाल महोदयांनीही शासनास दिलेल्या निर्देशांमध्ये शासनाने उद्दिष्ट साध्य न करता सिंचनावर केलेल्या खर्चाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहेच. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००९-१० मध्ये नोंदविण्यात आलेली निरीक्षणे:

- देशातील स्थूल सिंचित क्षेत्रापैकी केवळ ४.६ टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे.
- २००७-०८ मध्ये राज्यातील सिंचनाखालील निव्वळ क्षेत्र आधीच्या वर्षाच्या तुलनेत २.१ टक्क्यांनी वाढून ३३.११ लाख हेक्टर झाले.
- राज्यातील पिकाखालील एकूण क्षेत्रापैकी (२ कोटी २६ लाख ५५ हजार हेक्टर) स्थूल सिंचित क्षेत्राचे (४० लाख ३७ हजार हेक्टर) प्रमाण १७.८२ टक्के असून देशपातळीवर हे प्रमाण ४४.३ टक्के आहे.

## नियोजनाला हरताळ

प्रत्येक ५ वर्षांसाठी विकासाच्या प्राथमिकता ठरवून नियोजनबद्ध विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी आपल्या देशाने पंचवार्षिक योजनेची संकल्पना स्वीकारलेली आहे. १०वी पंचवार्षिक योजना मार्च,२००७ रोजी संपली. वर्ष २००७-१२ हा अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी आहे. या पंचवार्षिक योजनतील तीन वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी शासनाने अद्याप पंचवार्षिक योजना जाहीर केलेली नाही. एवढेच नव्हे तर गेल्या वर्षीपासून शासनाने विधिमंडळास अर्थसंकल्पासोबत वार्षिक योजना सादर करण्याची प्रथाही पाडली आहे. अर्थसंकल्पावर चर्चा करत असताना रु. ३३ हजार ९३५ कोटींच्या राज्य योजनेचा तपशील विधिमंडळ सदस्यांना उपलब्ध नाही.

## वसूल न झालेला कर व करेतर महसूल

| तपशिल | रुपये कोटीत |
|---|---|
| वसूल न झालेल्या कर महसुलाच्या विवादास्पद रकमा | ११,७८८.१० |
| वसूल न झालेल्या कर महसुलाच्या निर्विवाद रकमा | २२,९२०.८१ |
| करेतर महसुलाची थकबाकी | १७५६.०० |
| एकूण | ३६४६४.९१ |

*(स्त्रोत: महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाचा व्युहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरणे, २०१०-११)*

वर नमूद केलेल्या वसूल करावयाच्या कर व करेतर महसुलापैकी विवादास्पद रकमा वगळल्या तरी रु. २४ हजार ६७६ कोटी ८१ लाख एवढी रक्कम शासनास वसूल करता येण्यासारखी आहे. या वर्षीच्या महसुली तुटीच्या ती जवळपास चार पट आहे.

## अकस्मिकता निधीचा गैरवापर

अर्थसंकल्प तयार करताना जो खर्च अपेक्षित नव्हता परंतु जो तातडीने करणे अवश्यक असते असा खर्च करण्यासाठी संविधानाच्या अनुच्छेद २६७ नुसार अकस्मिकता निधी स्थापन केलेला आहे. अकस्मिकता निधीची मूळ मर्यादा वर्ष २००७-०८ मध्ये रु.१५० कोटी वरुन रु.५०० कोटी पर्यंत हंगामी स्वरुपात वाढविण्यात आली. आकस्मिकता निधीतून काढण्यात आलेल्या अग्रीमांपैकी रु.५८ कोटी ९४ लाख रकमेची प्रतिपुर्ती करण्यात आली नव्हती.

सन २००७-०८ या वर्षी रु.४९८ कोटी ९७ लाखांची आग्रीमे अकस्मिकता निधीतून काढण्यासाठी १०३ मंजुरी आदेश पारित करण्यात आले. त्यातील रु.१८ कोटी रकमेसाठीचा एक मंजुरी आदेश रु.४८ कोटी पर्यंत वाढवण्यात आला होता. रु.२० लाख रकमेचा एक मंजुरी आदेश नंतर रद्द करण्यात आला होता. १३ प्रकरणांमधील रु.२६४ कोटी ९० लाखांच्या निधीच्या अग्रीमाबाबत शासनाला अगाऊ अंदाज करणे शक्य होते असे मत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नोंदविले आहे.

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल
# ३१ मार्च २००८ (नागरी)

महामंडळांना दिलेली अनुदाने:

राज्याच्या अर्थव्यवस्थेवर ताण असतानाही राज्य शासन दरवर्षी महामंडळांना मोठ्या प्रमाणावर अनुदाने देत असते. वर्ष २००६-०७ मध्ये महामंडळांना महसुली जमेच्या ५ टक्के अर्थसहाय्य (रु.३ हजार ७७७ कोटी ) देण्यात आले. या अर्थसहाय्यापैकी ५३ टक्के सहाय्य महाराष्ट्र विद्युत मंडळाला देण्यात आले होते. वर्ष २००७-०८ मध्ये महामंडळांना रु.४ हजार ९३५ कोटी सहाय्य देण्यात आले. म्हणजे महसुली जमेच्या ६ टक्के रक्कम महामंडळांना अर्थसहाय्य म्हणून देण्यात आली. यापैकी ५७ टक्के सहाय्य विद्युत क्षेत्रासाठी होते.

शासनाने केलेली गुंतवणूक व त्यातून झालेला तोटा:

संविधानिक महामंडळे, ग्रामीण बँका, संयुक्त भांडवल कंपन्या आणि सहकारी सोसायट्या यामध्ये वर्ष २००३ ते २००८ अखेर शासनाने रु.४४ हजार २५६ कोटी गुंतविले होते. या गुंतवणुकीवर झालेला फायदा १ टक्क्यापेक्षा कमी होता. तर या गुंतवणुकीवर शासनाने सरासरी ७.०९ ते ८.६६ एवढ्या मोठ्या दराने व्याज भरले.

एकूण तोटा रु. ६ हजार ३०५ कोटी १६ लाख असलेल्या ४८ कंपन्या व १ महामंडळ यात शासनाने रु. १२ हजार २५१ कोटी ८९ लाख गुंतविले होते.

सहकार आयुक्त व आणि सहकारी सोसायट्यांचे महानिबंधक यांच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार ३,८९१ सहकारी सोसायट्या तोट्यात होत्या व त्यांचा संचयी तोटा रु. १८२ कोटी एवढा मोठा होता.

अपूर्ण प्रकल्प:

रु.कोटीत

| विभाग | अपूर्ण प्रकल्पांची एकूण संख्या | प्राथमिक किंमत | ३१ मार्च २००८ रोजी प्रत्यक्ष खर्च | प्राथमिक किंमत व प्रत्यक्ष खर्चातील तफावत |
|---|---|---|---|---|
| सार्वजनिक बांधकाम | ९७ | ५७२.९३ | ५१८.०६ | -५४.८७ |
| पाटबंधारे | २५ | ९११.६१ | ५०४२.२१ | ४१३०.६० |
| **एकूण** | **१२२** | **१४८४.५४** | **५५६०.२७** | **४०७५.७३** |

पाटबंधारे प्रकल्प १ ते २२ वर्षे प्रलंबित असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रकल्प १ ते १३ वर्षे प्रलंबित आहेत.

अविवेकी पुनर्विनियोजन:

अनुदानाच्या एकाच मागणीत एखाद्या बाबीसाठी तरतूद केलेला निधी खर्च न होण्याची शक्यता असेल आणि त्याच मागणीत दुसऱ्या एखाद्या बाबीवर अतिरिक्त निधीची आवश्यकता असेल तर निधीचे जे लेखांतरण केले जाते त्यास पुनर्विनियोजन म्हणतात. तत्वत: असे पुनर्विनियोजन होणे अपेक्षित नाही. असे असताना वर्ष २००७-०८ मध्ये ६७ प्रकारणांमध्ये रु.१ कोटीपेक्षा अधिक निधीचे पुनर्विनियोजन करण्यात आले.

रु.३ हजार २४९ कोटी ३१ लाखांची बचत विभागांनी स्वत:कडेच ठेवली:

विभागांनी उपलब्ध तरतुदीपैकी जर काही निधी खर्च न होण्याची शक्यता असेल तर ही बचत वित्त विभागास प्रत्यार्पित करावयाची असते. ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षात १४ प्रकरणात मोठी बचत झालेली असताना विभागांनी रु.१३६ कोटी १० लाखांची बचत प्रत्यार्पित केली नाही. तर ३४ प्रकरणात बचत झालेल्या रु.७ हजार १५७ कोटी ८३ लाखांपैकी रु.३ हजार ११३ कोटी २१ लाख एवढी बचत विभागांनी प्रत्यार्पित केली नाही.

खर्च न झालेल्या रु.१० हजार २१६ कोटी ४१ लाख रकमेचे ३० व ३१ मार्चला प्रत्यार्पण:

वर्ष संपण्यास केवळ २ दिवस उरले असताना ६१ प्रकारणांत खर्च न झालेला रु.१० हजार २१६ कोटी ४१ लाख निधी परत करण्यात आला. त्यामुळे जेथे अधिक निधी खर्च करण्याची आवश्यकता होती अशा कार्यक्रमांवर हा निधी खर्च करता आला नाही.

बचतीपेक्षा अधिक निधीचे प्रत्यार्पण!

विभाग केवळ बचती प्रत्यार्पित करीत नाहीत असे नाही तर अनेक वेळा ते बचतीपेक्षा अधिक निधीही प्रत्यार्पित करतात. वर्ष२००७-०८ मध्ये प्रत्यक्ष बचत रु.२ हजार ६९ कोटी ५५ लाखांची झालेली असताना रु.२ हजार ६१० कोटी ८६ लाखांची रक्कम परत करण्यात आली. म्हणजेच रु.५४१ कोटी ३१ लाख रकमेचे अधिक प्रत्यार्पण करण्यात आले.

वर्ष २००२ ते ०८ या काळात विधिमंडळाच्या परवानगीशिवाय खर्च झालेला रु.६ हजार ६६६ कोटी १७ लाखांचा निधी नियमित झालेला नाही:

२००२-०७ या कालावधीतील रु. ६ हजार ७८ कोटी ७६ लाख खर्चाचे अधिक्य अद्याप विधिमंडळात नियमित करण्यात आलेले नाही. या आधिक्याची कारणेही भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना उपलब्ध झालेली नाहीत. त्याचप्रमाणे २००७-०८ यावर्षी अनुदाने व विनियोजनात अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा रु.५८७ कोटी ४१ लाख एवढा अधिक खर्च झाला. यामध्ये तरतूद नसताना रु.४१ कोटी ४१ लाख खर्च केल्याच्या १३ प्रकरणांचा समावेश आहे.

शासनाने घेतलेली अग्रीमे आणि अधिकर्ष

| **वर्ष** | **अग्रिमे** (रु.कोटीत) | **अर्थोपाय अग्रीमे घेतलेले दिवस** | **अधिकर्ष** (रु.कोटीत) | **अधिकर्ष घेतलेले दिवस** |
|---|---|---|---|---|
| २००५-०६ | २३८६.६२ | २१ | १२९८.३१ | २० |
| २००६-०७ | २६६४.८३ | ४२ | — | — |
| २००७-०८ | १९५३.६३ | २५ | — | — |

प्रशासनाची मनमानी - रु.२१ हजार ६२९ कोटींची उपयोजन प्रमाणपत्रे सादर केली नाहीत.

वर्ष २००७-०८ पर्यंत शासनाने दिलेल्या एकूण रु.२१ हजार ८६६ कोटी अनुदान व कर्जासाठी १,०८,२७९ उपयोजन प्रमाणपत्रे (Utilization Certificates) अपेक्षित होती. यापैकी रु.२१ हजार ६२९ कोटी (९८.९ टक्के) रकमेची १,०८,०९७ (९९.८ टक्के) उपयोजन प्रमाणपत्रे सादर करण्यात आली नाहीत.

**विभागनिहाय प्रलंबित उपयोजन प्रमाणपत्रे (कर्जे)**

| विभाग | प्रमाणपत्रांची संख्या | रुपये (कोटीत) |
|---|---|---|
| कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास आणि मत्स्य व्यवसाय | १०७ | २३.४९ |
| सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग | २२८ | ३७०.११ |
| गृह निर्माण | ६६ | ०.८८ |
| उद्योग, उर्जा आणि कामगार | २४६२ | ६१.३६ |
| सार्वजनिक आरोग्य | ७ | ०.५६ |
| महसुल आणि वने | ५४८ | ३०२.१४ |
| ग्राम विकास आणि जलसंधारण | १८ | २.४ |
| सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य आणि विशेष सहाय्य विभाग | ११२ | १३४.३५ |
| आदिवासी विकास | ९३ | ०.१४ |
| नगर विकास | ३३५ | ६५.४४ |
| पाणी पुरवठा आणि स्वच्छता | १ | ६२.७९ |
| **एकूण** | **३९७७** | **१०२३.३०** |

**विभागनिहाय प्रलंबित उपयोजन प्रमाणपत्रे (अनुदान)**

| विभाग | प्रमाणपत्रांची संख्या | रुपये (कोटीत) |
|---|---|---|
| कृषी, पशु संवर्धन दुग्ध व्यवसाय विकास आणि मत्स्य व्यवसाय | १४६७५ | ६४४.२७ |
| सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग | १९६४ | ५४१.१७ |
| रोजगार आणि स्वयंरोजगार | १९ | ५.७४ |
| पर्यावरण | ०१ | ०.०९ |
| वित्त | २० | १५.५४ |
| अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण | ४५ | ०.४० |
| सामान्य प्रशासन | १४० | ६८.९० |
| उच्च आणि तंत्र शिक्षण | ११९७ | १५८९.८३ |
| गृह | १२७१ | ८०४.६८ |
| गृह निर्माण | २९ | ५.८१ |
| उद्योग, उर्जा आणि कामगार | ९९ | ४.१२ |
| पाटबंधारे | ७ | ०.०५ |
| कायदा आणि न्याय | ५२३ | २.७० |
| वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्य | २८८ | ४४.२६ |
| नियोजन | ५१३३ | १०४५.१६ |
| सार्वजनिक आरोग्य | ३५६३ | ५११.४० |
| सार्वजनिक बांधकाम | २६३ | १०३.१२ |
| महसुल आणि वने | ९२७२ | ९५०.१५ |
| ग्राम विकास आणि जलसंधारण | ८३०७ | २४०७.६७ |
| शालेय शिक्षण आणि क्रिडा | ११४६४ | ५७०८.३४ |
| सामाजिक न्याय, सांसकृतिक कार्य आणि विशेष सहाय्य विभाग | २९९३७ | ८९८.८३ |
| आदिवासी विकास | ४८९९ | १४०३.५२ |
| नगर विकास | २०९८ | २२८३.४८ |
| जलसंपदा | २५९ | ४.५२ |
| पाणी पुरवठा आणि स्वच्छता | २५०१ | ११११.७९ |
| महिला आणि बाल विकास | ६१४६ | ४५०.६१ |
| **एकूण** | **१०४१२०** | **२०६०६.१५** |

## निवडक जिल्ह्यातील राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी

| जिल्हे | जॉबकार्ड प्राप्त कुटुंबांची संख्या | जॉबकार्ड न मिळालेल्या कुटुंबांची संख्या | रोजगार प्राप्त कुटंबांची संख्या | १० दिवसांपर्यंत रोजगार प्राप्त कुटुंबांची संख्या | ११ दिवस ते १ महिन्यांपर्यंत रोजगार प्राप्त कुटुंबांची संख्या | १ते ३ महिने रोजगार प्राप्त कुटुंबांची संख्या | १०० दिवसांपेक्षा अधिक रोजगार प्राप्त कुटुंबांची संख्या | एकूण मनुष्यदिन निर्मिती (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रायगड | ७८५३० | ३३२३३ | २२०२ | ७४ | ० | ०१ | ० | ०.१५ |
| धुळे | १७५३०८ | ११ | १२८३४ | ७७५ | २०८८ | १६०३ | ९४४ | ६.१६ |
| भंडारा | १९३२०८ | ३४२३ | ३५८५९ | १०,८१६ | १८७३० | १३४६१ | ७७४ | ३७.०८ |
| ठाणे | २३५४६४ | ५७६० | ५१४५५ | ८१८५ | १०,८८१ | ४४४७ | १९६ | ८.६६ |
| अमरावती | २३९८६६ | ३१५ | ३७२७८ | ३४७२ | ९२४३ | ४७३२ | ४०९ | ९.९९७ |
| चंद्रपूर | २३८२३९ | ४५३ | १६३२२ | ४०६५ | ६८८६ | ३२३५ | १५९ | ५.५९२ |
| गोंदिया | २०१४३० | १५६२ | ३५००४ | ६३३८ | १५१११ | ८०३० | ४३२ | १५.८८ |
| नंदूरबार | २२४२१२ | २१२९ | ६९३१९ | ५४१७ | १३२०३ | १४२७२ | ४२५५ | २५.४८ |
| गडचिरोली | १६५०३५ | ७२५ | ३६७९२ | ४२७९ | ११३१४ | ६८७३ | १०४५ | २४.९२ |

## शासनाने दिलेली हमी

*रु.कोटीत*

| विभाग | हमीच्या नोंदी | वर्ष २००८-०९ प्रारंभीची अदत्त रक्कम | वर्षभरात पडलेली भर | वर्ष २००८-०९ मध्ये कमी झालेली रक्कम | वर्ष२००८-०९ अखेरीस अदत्त रक्कम | हमी बद्दलचे कमीशन किंवा फी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | २००८-०९ प्राप्य रक्कम | २००८-०९ प्राप्त रक्कम |
| कृषी व पदुम | ५ | १९६.०८ | ४५७.५० | २०२.३५ | ४५१.२३ | ५७४९.९९ | ३५३९.०२ |
| उद्योग, उर्जा व कामगार | ३१ | ८७४.६७ | ०.०० | ५४४.९० | ३२९.७७ | | |
| सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | १७ | १८२.४३ | १३४.४७ | ३८.४४ | २७८.४६ | | |
| पर्यटन व सांस्कृतिक | १ | ६.४० | | २.३३ | ४.०७ | | |
| नगर विकास | ६ | २३६.१८ | | ६.८६ | २२९.३२ | | |
| उद्योग, उर्जा व कामगार (उर्जा) | २६३ | ४९६६.५७ | ३००.०० | १०८९.७२ | ४१७६.८५ | | |
| जलसंपदा विभाग | ३२ | ५५६३.३५ | | २४४०.३४ | ३१२३.०१ | | |
| गृह विभाग | १ | ३२.०५ | | १६.९१ | १५.१४ | | |
| सार्वजनिक बांधकाम विभाग | ७ | ३६९७.७८ | | १६२.३६ | ३५३५.४२ | | |
| महसूल व वन विभाग | ३ | २.१३ | | | २.१३ | | |
| आदिवासी विकास विभाग | २१ | ३७.७१ | २५.०० | १३.०७ | ४९.६४ | | |
| सहकार पणन व वस्त्रोद्योग | ११८ | १५४३३.११ | २२३६.४८ | १२७५१.३२ | ४९१८.२७ | | |
| ग्राम विकास व जलसंधारण | ३ | १४६.४३ | | ६०.१४ | ८६.२९ | | |
| पाणी पुरवठा व स्वच्छता | १७३ | ३२४२.८६ | | ४३०.५० | २८१२.३६ | | |
| अल्पसंख्यांक | १ | १९.३६ | ६.४२ | ३.१९ | २२.५९ | | |
| नियोजन | ४ | १४४९.१२ | ०.०० | १८२.४५ | १२६६.६७ | | |
| | ६८६ | ३६०८६.२३ | ३१५९.८७ | १७९४४.८८ | २१३०१.२२ | ५७४९.९९ | ३५३९.०२ |

*स्त्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण वर्ष २०१०-११*

## महामंडळे की पांढरे हत्ती ?

राज्य शासनाच्या विविध विभागांतर्गत ५१ महामंडळे येतात. यापैकी २७ महामंडळे तोट्यात आहेत. त्यातील सर्वाधिक तोटा असलेल्या ५ महामंडळांचा तोटा व त्याचे प्रमाण ठळक अक्षरात दर्शवले आहे.

| अक्र. | सार्वजनिक उपक्रम | रुपये कोटीत | एकूण तोट्याशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित | १,५२७.८२ | २७.४७ |
| २. | मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित * | १२९४.०० | २३.२७ |
| ३. | महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित * | ७०१.६३ | १२.६२ |
| ४. | महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ | ६१४.९७ | ११.०६ |
| ५. | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ * | ५७८.९२ | १०.४१ |
| | **पाच महामंडळांचा एकत्रित तोटा** | **४,७१७.३४** | **८४.८३** |
| ६. | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित | ३०३.४१ | ५.४६ |
| ७. | महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित | १७५.२७ | ३.१५ |
| ८. | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ | ९१.४५ | १.६४ |
| ९. | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित | ७८.१ | १.४० |
| १०. | महाराष्ट्र जलसंधारण विकास महामंडळ मर्यादित | ३५.३७ | ०.६२ |
| ११. | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित | ३३.९४ | ०.६१ |
| १२. | पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित | २३.३३ | ०.४१ |
| १३. | महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित | १६.४८ | ०.२९ |
| १४. | मॅफको मर्यादित | १५.३९ | ०.२८ |
| १५. | विदर्भ विकास महामंडळ मर्यादित * | १४.५५ | ०.२६ |
| १६. | कोकण विकास महामंडळ मर्यादित * | १४.०६ | ०.२५ |
| १७. | महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित | ७.०१ | ०.१३ |
| १८. | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | ६.३३ | ०.११ |
| १९. | महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ | ५.८४ | ०.११ |
| २०. | महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ मर्यादित | ५.१८ | ०.०९ |
| २१. | वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित | ४.७९ | ०.०९ |
| २२. | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित | ४.७६ | ०.०९ |
| २३. | कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित | २.५३ | ०.०५ |
| २४. | महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित | २.३७ | ०.०४ |
| २५. | महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित | १.८४ | ०.०३ |
| २६. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित | ०.५८ | ०.०१ |
| २७. | महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित | ०.२७ | ०.०१ |
| | एकूण | **५,५६०.१९** | **१००.००** |

*(स्रोत :माहितीच्या अधिकाराखाली वित्त विभागाकडून मिळालेली माहिती. * हे चिन्ह वर्ष २००७-०८ चा तोटा दर्शविते तर इतर महामंडळांचा तोटा वर्ष २००५-०६चा आहे.)*

वरील तोट्यात चालणाऱ्या २७ महामंडळापैकी सुरुवातीची पाच महामंडळे ही सर्वाधिक तोट्यात चालणारी महामंडळे असून त्यांच्या एकत्रित तोट्याची रक्कम ८४ टक्क्यांपैकी अधिक आहे.

## जिल्ह्यांतर्गत दरडोई निव्वळ उत्पन्न

| अक्र | जिल्हा | दरडोई निव्वळ उत्पन्न (₹) | | अक्र | जिल्हा | दरडोई निव्वळ उत्पन्न (₹) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००७-०८* | २००८-०९@ | | | २००७-०८* | २००८-०९@ |
| १. | मुंबई # | ७७,१४५ | ८९,३४३ | १८. | परभणी | ३२,१०२ | ३६,१६१ |
| २. | ठाणे | ६९,२३५ | ७८,५३१ | १९. | हिंगोली | ३०,२५७ | २९,१५० |
| ३. | रायगड | ५५,९३५ | ५७,०७४ | २०. | बीड | ३१,५६२ | ३३,६७२ |
| ४. | रत्नागिरी | ३९,५२७ | ४५,०६० | २१. | नांदेड | २५,५८१ | २८,८५३ |
| ५. | सिंधुदुर्ग | ४०,७३८ | ४७,१८३ | २२. | उस्मानाबाद | २९,९२४ | २९,१५५ |
| ६. | नाशिक | ५१,७९१ | ५५,८४१ | २३. | लातूर | २९,४१० | २८,७६४ |
| ७. | धुळे | ३१,१९४ | ३३,८६९ | २४. | बुलढाणा | २७,३२६ | ३०,१६५ |
| ८. | नंदूरबार | ३३,२४० | ३०,५१६ | २५. | अकोला | ३३,८३४ | ३६,७५० |
| ९. | जळगाव | ३७,६५१ | ४३,१८४ | २६. | वाशिम | २७,४६९ | २३,६२८ |
| १०. | अहमदनगर | ४१,५८४ | ४७,८५६ | २७. | अमरावती | ३१,३१७ | ३६,७१० |
| ११. | पुणे | ७१,०७३ | ७९,९६८ | २८. | यवतमाळ | ३२,३४९ | ३६,९७९ |
| १२. | सातारा | ४३,५३१ | ४७,००९ | २९. | वर्धा | ३८,४३४ | ४१,७५७ |
| १३. | सांगली | ४१,३२१ | ४६,६९९ | ३०. | नागपूर | ५२,८८४ | ६०,५९२ |
| १४. | सोलापूर | ४०,८९९ | ४५,०५५ | ३१. | भंडारा | ३८,४३९ | ४२,०३७ |
| १५. | कोल्हापूर | ५०,४४५ | ५५,९३१ | ३२. | गोंदिया | ३३,८०७ | ३६,९८६ |
| १६. | औरंगाबाद | ४२,९२७ | ४९,४६५ | ३३. | चंद्रपूर | ४०,३७९ | ४३,४५६ |
| १७. | जालना | २८,७५४ | २३,६३५ | ३४. | गडचिरोली | २४,११५ | २४,३७० |
| | | | | | **महाराष्ट्र** | **४९,०५८** | **५४,८६७** |

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००९-१० (* अस्थायी @ प्रारंभिक # मुंबई शहर + मुंबई उपनगर)